# कोरोना व चीनचे राजकारण

**डॉ. अरुण चव्हाण**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग भोगावती महाविद्यालय, भोगावती

**प्रस्तावना:**

जगाच्या सामाजिक व राजकीय परिस्थितीचा विचार करताना काही महत्त्वाच्या टप्प्याचा विचार करावा लागतो. यामध्ये विविध देशामधील राजेशाही संपुष्टात येऊन लोकशाहीची वाटचाल सुरु झाली. त्यानंतर औद्योगिक क्रांती व विविध शोधामुळे मानवी जीवन बदलून गेले यातूनच पहिले व दुसरे महायुध्द घडून आले. यानंतर जगाची सरंचना बदलून व्यापार, सैनिक क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र, अंतराळ क्षेत्र यामध्ये झपाटयाने प्रगती होऊन भांडवलशाहीवादी व समाजवादी विचारसरणीने अशी जगातील देशाची विभागणी होऊन शीतयुध्दाची परिसीमा गाठली गेली. सोविएत रशिया नष्ट झाल्यानंतर मात्र शीतयुध्द थांबले आणि जगातिकीकरण मुक्त अर्थव्यवस्था यांचे वारे वाहू लागले. प्रंचड नफेखोरीच्या हव्यासापोटी विविधि करार अस्तित्वात आले. देशांची सुरक्षा, नागरीकांचे आरोग्य, त्यासाठी लागणारे अन्न या सारख्या गोष्टींकडे दुर्लक्ष होऊन केवळ चंगळवादाचे ओंगळवाणे चित्र जगभरात दिसू लागले.

लोकशाहीची सुरुवात, औद्योगिकरण, दोन्ही महायुध्दे, शीतयुध्द, जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था अशा मार्गाने जगातील व्यवस्थेमध्ये होणारे बदल मानवाला समजून येत होते. कींबहूना त्याची चाहूल मानवाला लागत होती. जगभरामध्ये अमेरिका, चीन, रशिया, यासारखे देश तसेच युरोपियन महासंघ, जपान, द. कोरिया या सारखे पुर्व आशियाई देश या मुक्त अर्थव्यवस्थेची गोड फळे चाखत होती. यामध्ये चीन सोडला तर सर्व देश लोकशाही मानणारे होते. सोविएत रशियाच्या पतनानंतर अमेरिका जगभरामध्ये एकमेव बलाढय देश उरला त्यामुळे त्यांनी अनेक देशांबरोबर करार करुन आपली महासत्ता बळकट करण्याचा प्रयत्न केला. यामध्ये साम्यवादी चीन सुध्दा होता. चीनमध्ये असणारी कम्युनिस्ट पक्षाची निरंकुश सत्ता जागतिकिकरणाचा व मुक्त अर्थव्यवस्थेचा कशा प्रकारे फायदा उठवू शकते याची जाणीव सुरुवातीस अमेरिकेला आली नाही परंतु नंतर त्यांना चीन आर्थिकदृष्टया किती बलाढय बनला हे लक्षात आले.

वरील सर्व विवेचनाचा भाग ऐवढयासाठीच की डिसेंबर २०१९ मध्ये चीन एका विचित्र विषाणूने ग्रासला तो विषाणू म्हणजे (कोवीड १९) कोरोना. दुर्दैवाने या विषाणूमुळे होणाऱ्या ताप, अंगदुखी, सर्दी यामुळे माणूस मरु शकतो यावर संपूर्ण जगाचा विश्वास बसला नाही यावर औषध नाही. हा मानवाच्या एकमेकांच्या संपर्कातून अलग ठेवणे हाच यावरील पर्याय समोर आला. डिसेंबर २०१९ मध्ये कोरोनाचा प्रार्दुभाव चीनमध्ये जाणवू लागला. मात्र चीनने तो सर्व जगापासून लपवून ठेवला. जागतिक आरोग्य संघटनेने सुध्दा ही बाब दुर्लक्षित का केली हे न समजण्यासारखे आहे.

**जागतिक परिणाम:**

कोविड १९ (कोरोना) मुळे संपूर्ण जगाची प्रस्थापित व्यवस्था मोडून पडली. १९९१ नंतर अमेरीका व चीन यांचे संबंध खूपच सुरळीत बनले होते. अनेक अमेरिकन व्यवसायिकांनी चीनमध्ये कारखाने उभे करुन कमी उत्पादन खर्चामध्ये वस्तुंचे उत्पादन करुन त्याची विक्री करुन मोठया प्रमाणात नफा मिळविण्यासाठी गुंतवणुक केली होती. त्यामुळे अमेरिका —चीन युरोपियन महासंघ यांच्याशी संबंध जुळवत चीनने आपली अर्थव्यवस्था झपाटयाने सुधारली. यामध्ये चीनचा विचार एवढयासाठीच करावा लागेला कारण कोरोना विषाणू चीनच्या हुबेई प्रांतातील वुहान शहरामधून प्रसारीत झाला. त्याचा परीणाम ८० देशांच्या आरोग्यावर व उदयोगधंदयावर झाला. परिणामी चीन व अमेरिका यांचे संबंध ताणले असून चीनमधून गुंतवणूक काढून घेण्याचे आवाहन अमेरिकेच्या अध्यक्षांनी अमेरीकन उद्योबपतींना केली. याच बरोबर अमेरिकन अध्यक्षांनी चीनवर कोरोना विषाणू वुहानमधील प्रयोग शाळैत तयार करुन

जगभर पसरविण्याचा उद्योग केला असा आरोप केला. चीन बरोबरचे संपूण संबंध तोडण्याचा विचार करुन डिसेंबर मध्ये ही साथ आली असताना जागतिक आरोग्य संघटनेने याकडे दुर्लक्ष केले व जागतिक महामारी घोषित करण्यासाठी दोन महिने अवधी घेतला त्यामुळे चीन व W.H.O. चे साटेलोटे असल्याचा आरोप करुन W.H.O. ला दिली जाणारी मदत गोठविण्याची धमकी देखील अमेरिकन अध्यक्षांनी दिली. परिणामी ज्या हेतूने युनोची स्थापना करण्यात आली त्या हेतूलाच धक्का पोहचला.

**चीन व युरोपियन महासंघः**

मुक्त अर्थव्यवस्थेनंतर युरोपियन महासंघ व अमेरिका यांच्यात सुप्त संघर्ष सुरु झाला. युरो विरुध्द डॉलर यांच्यातील हा संघर्ष व्यापारी नफ्यामध्येच प्रामुख्याने होता सुरुवातीपासून अमेरिकेचे पारंपारिक मित्र इंग्लड, फ्रान्स, पोर्तुगाल हे देश यामध्ये असल्यामुळे अमेरिकेची डोकेदुखी जास्त वाढली होती. या सर्वाचा फायदा चीन ने घेतला. यामध्ये आपल्याला प्रामुख्याने इटलीचा विचार करावा लागेल. कारण कोरोनाने चीन नंतर खूप मोठयाप्रमाणात इटलीमध्ये जीवीत हानी घडवून आणली. मार्च २०१९ मध्ये चीनी अध्यक्ष शी जिनपिंग यांनी रोमला भेट दिली. त्यामध्ये २.५ अब्ज युरो किंमतीचे २९ करार संमत केले. सुरुवातीस युरोपियन संघाना इटलीच्या या भूमिकेचे आश्चर्य वाटले मात्र नंतर जर्मनीने २०१८ मध्ये २०० अब्ज युरो किंमतीच्या सेवांचे व वस्तूंचे आदान प्रदान केले. अशा प्रकारे मोठया देशाला नफ्याची आशा दिसू लागल्या नंतर युरोपातील १६ + १ असे देश चीन बरोबर सहकार्य करण्यासाठी पुढे आले. यामध्ये ११ छोटे युरोपियन देश व ५ बाल्कन देश यामध्ये समाविष्ट झाले. याचबरोबर ग्रीसमध्ये पिरव्हेस या बंदरात चीनने मोठी भागिदारी मिळविली. या सर्व घडामोडीमध्ये चीनची प्रचंड वेगाने विस्तारत असलेली अर्थव्यवस्था व त्याच्या नफ्यामध्ये सहभागी होण्याची धडपड यामुळे युरोपियन देश वन बेल्ट—वन रोड हा प्रकल्प हाती घेतला ज्यामध्ये ६५ देशात खुष्कीच्या मार्गाने पोहचण्याची योजना चीन ने आखली. यामध्ये युरोपमध्ये प्रवेश करण्यासाठी युरोपचे प्रवेशद्वार इटलीमध्ये चार लाखापेक्षा चीनी नागरिक ये जा करत होते. इटलीतील कापड उद्योगामध्ये देखील चीनी कामगार होतेच ते प्रामुख्याने वुहान मधून येत असल्याने झटलीतील मिलान शहरात कोरोनाने हाहाकार माजवला इटालियन पंतप्रधानांना हताशपणे अश्रू ढाळण्याव्यतिरिक्त पर्याय उरला नाही.

जागतिक अर्थव्यवस्थेत व परीवर्तनशील जागतिक राजकारणात चीनला जगाचे उत्पादन केंद्र किंवा जगाचा कारखाना हे नामाभिधान कोरोनामुळे टिकविता येणार नाही. युरोपिय देशांमध्ये झालेल्या कोरोनाच्या प्रसाराने चीनच्या पोलाद उत्पादनावर, लोखंड, सिंमेट, अल्युमिनियम, साय, कोळसा, जहाजबांधणी आणि सौर उर्जा संच या उत्पादनांना मोठे नुकसान सहन करावे लागेल. इटलीमधील नागरिकांनी ज्या अपेक्षेने सार्वजनिक ठिकाण चीनी नागरिकांना अलिंगत दिले. याचे परीमाण म्हणूनच त्यांना आज अखेर २८७१० नागरीकांना मुकावे लागले तसेच संपूर्ण अर्थव्यवस्था उध्वस्त झाली.

**चीन व आशियाः**

चीनचे आशियामध्ये प्रामुख्याने जपान, द. कोरीया, मलेशिया व भारत या देशांबरोबर आर्थिक संबंध असल्याचे दिसते. परंतु या व्यवहारामध्ये खुलेपणा आढळत नसून जपान व कोरीया देशातील कंपन्या चीनमध्ये गुंतवणूक करुन वस्तूंचे उत्पादन करुन वितरीत करण्याव्यतिरिक्त चीन बरोबर जास्त संबंध ठेवताना दिसत नाहीत. द. चीन समुद्रावरुन जापन, द. कोरीया, तैवान यांच्याबरोबर चीनचे संबंध तणावाचे आहेत. भारताबरोबर देखील चीनचे संबंध अधिक सौर्हादाचे असण्यापेक्षा डोकलाम, अरुणाचल प्रदेशामधील सीमा प्रश्नावरुन तणावाचे राहीले आहेत. एकुणच आशियामधील चीनची सीमा १४ देशांना लागून आहे. यापैकी १३ देशांबरोबर चीनचे संबंध तणावाचे आहेत. पाकिस्तान सोडले तर चीनचे संबंध कोणत्याही देशांबरोबर चांगले नाहीत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर याचा फायदा आशियातील देशांना जास्त झाला. कारण युरोपीय देशांशी ज्या प्राप्त चीनी पर्यटक कामगार, उद्योगपती यांचे संबंध आले

व कोरोनाचा झपाटयाने प्रसार झाला तसा प्रसार आशियात होऊ शकला नाही. परिणामी मलेशिया, भारत, जपान, द. कोरीया हे देश चीनच्या जवळ असून देखील या देशात कोरोनाचा प्रार्दुभाव फारसा जाणवला नाही. पण लॉकडाऊनमुळे येथील अर्थव्यवस्था डळमळीत झाल्या. श्रीलंका, व्हीयतनाम, म्यानमार या देशांना आर्थिक मदत कर्ज रुपाने देऊन चीन त्यांना अंकित करु पाहत आहे. परंतु आजच्या जागतिक परिस्थितीमध्ये चीनचे आपली विश्वासार्हताच गमावली आहे.

**चीन—आफ्रिका:**

चीन ते आफ्रिकी देशातील दारिद्रियाचा फायदा घेऊन नव आर्थिक साम्राज्यवाद पसरविणची महत्त्वकांक्षा दिसते. यामधूनच केनिया, इथोपिया, द. आफ्रिका, युगांडा या देशांत आर्थिक मदत करुन चीन आपले उत्पादन खपवून नफा कमविण्या व्यतिरिक्त हिंदी महासागरामध्ये आपल्या जयजांना आफ्रिकन देशांच्या किनाऱ्याद्वारे सुरक्षित्ता शोधण्याचा प्रयत्न करत आहे. आफ्रिका खंडामध्ये ५४ देश येतात. यामध्ये चीनने पायाभूत सुविधा रस्ते, वीज प्रकल्प, पुल यामध्ये गुंतवणूक केली आहे. आफ्रिकी देश चीनला खनिज संपत्ती व कच्चा माल यांचा पुरवठा करतात. साधारणपणे २० हजार कोटी डॉलरचा व्यापार आज चीन आफ्रिकेबरोबर करत आहे. दहा हजार पेक्षा जास्त चीनी कंपन्या आफ्रिकेत व्यापार करताना दिसतात. दोनतृतीयांश पेक्षा जास्त आफ्रिका चीनी आर्थिक साम्राज्यवादामध्ये अडकला आहे असे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने स्पष्ट केले आहे. यामुळे भविष्य काळात चीनचा प्रचंड दबाव आफ्रिकेवर असेल असे असलेतरी कोरोना पार्श्वभूमीवर आफ्रिकन देशामध्ये कारोनाने पाय पसरले आहेत. या ठिकाणी आरोग्य व्यवस्थेची खूपच वाईट हालत आहे. अगोदरच एड्स, इबोला या सारखा विषाणूंनी अगोदरच धुमाकुळ घातला आहे. कोरोनाने आफ्रिकेतील जनजीवन विस्कळीत झाले आहे. याचा परीणाम चीनला होणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठयावर निश्चितच होईल. परिणामी चीनच्या अर्थव्यवस्थेला याचा धक्का बसेल. चीनी कंपन्याना यामुळे प्रचंड नुकसान सहन करावे लागेल. याच ध्येय चीनच्या गुअलझोन श्हरात आफ्रिकी तज्ञ व विदयार्थी यांच्याशी वर्णद्वेषी वागणूक केली. यामुळे चीन विरोधात आफ्रिकेमध्ये असंतोष वाढत आहे. टांझनियाने १० मिलीयन डॉलरचे कर्ज नाकारले, नायझेरीया सरकारने देखील चीनला याबाबत फटकारले. या सर्वाचा एकत्रीत परिणाम कोरोना नंतरच्या जगावर होऊन चीन जगामध्ये एकाकी पडले की काय अशी तज्ञांकडून भिती व्यक्त केली जात आहे.

याशिवाय ब्राझील, अर्जेटीना, व्हेनेझुएला या देशांनी सुरुवातीस कोरोनाचे संकट फारसे गंभीर घेतले नाही. परंतु त्याचे परिणाम ज्या प्रकारे त्यांना जाणवू लागले तसे ब्राझीलच्या पंतप्रधानांनी चीनचा निषेध करत कोरोनाला चीनी विषाणू असेच संबोधले.

वास्तिविक या सर्व बाबी चीनच्या विरोधातील दिसत असल्यातरी रशियाची भूमिका यामध्ये महत्वाची ठरणार आहे. कारण अमेरिका व चीन यांचे आर्थिक संबंध त्यांना डोकेदुखीच होती. या संबंधामध्ये बिघाड झाला तरी रशियाला कोरोनाचे परिणाम भोगावेच लागले आहेत. शीत युध्द काळापासून चीन व रशिया संबंध फारसे चांगले नव्हतेच साम्यवादी गटाचे नेतृत्व कोणी करावयाचे याबाबतीत संघर्ष नेहमीच दिसतो. आजच्या पार्श्वभूमीवर चीन आर्थिकदृष्टया सक्षम झाल्यानंतर रशिया व चीनचे आर्थिक संबंध फारसे चांगले दिसत नाहीत. अशा परिस्थितीत या दोन देशात २०१७ मध्ये ३७ हजार मिलीयन डॉलरचा व्यापार झाला. मात्र रशिया खूच कमी प्रमाणात चीनी वस्तू आयात करतो व चीनला मोठयाप्रमाणात कच्चा माल निर्यात करतो मात्र या दोन देशांदरम्यान दमेस्की बेटावरुन निर्माण झालेला संघर्ष त्यांना दूर नेतो तर रशियावर लादलेली आर्थिक नाकेबंदी रशियाला चीनच्या जवळ नेते. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर चीनची विश्वासार्हता कमी झाली. चीनने लॉकडाऊनमध्ये चीनी नागरीकांना रशियातून परत येण्यास बंदी घातली. रशियामध्ये कारोनाचा झापाटयाने प्रसार होऊ लागल्याने रशियाला आर्थिक अरिष्टास तोंड दयावे लागत आहे.

थोडक्यात कोरोनाच्या प्रभावामुळे जागतिक संरचनेवर परीणाम निश्चित होणार आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे काही मुदयांचा विचार करावा लागेल.

१) चीनची व्यापारामधील विश्वासार्हता कमी झाली कारण त्यांनी या विषाणूंचा प्रसार झाल्याने मानवी जीवनावर काय परिणाम होतो हे जगाला कळविण्यास उशीर केला व वुहान मधून कोरोनाचा प्रसार झाला हेच नाकारले.

२) अमेरिका व चीन यांचे संबध पूर्ण बिघडल्याने जागतिक सत्ता संतुलन विस्कळीत होऊन कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यानंतरच जगाचे नेतृत्व कोण करेल हे निश्चित होईल.

३) W.H.O. सारख्या आंतरराष्ट्रीय संघटनेची विश्वासार्हता कमी झाली त्यांनी कोरोनाची रोगाची दाहकता स्पष्ट करण्यात उशीर केला. ती महामारी आहे याची जाणीव जगातील देशांना करुन देई पर्यंत जागतील १०० पेक्षा जास्त देशात कोरोनाचा फैलाव झाला. मानवाच्या संपर्कातून माणवाला हा रोग होतो हेच त्यांनी सुरुवास मान्य केले नाही. याचबरोबर चीनी औषध कंपन्यांना दिलेली कंगारे ही देखील W.H.O. चे अध्यक्ष दग्रायसौस यांच्यावर आक्षेप येणारी ठरली आहेत. यामुळे युनो सारख्या संघटनेत देखील फेरबदल होऊ शकतात.

४) भारतासारखेच अमेरिका, रशिया, इटली, स्पेन, ब्राझील, इंग्लड, ऑस्ट्रेलिया या सारख्या देशांनी शेअर मार्केटमधील गुंतवणूक करण्यास चीनला पूर्णपणे बंदी घातली व यातून जगातील प्रमुख देश चीनच्या विरोधात एकवटताना दिसतात.

५) चीनने वुहानच्या प्रयोगशाळेची तपासणी करण्यास व कोरोना बाबत संरक्षण परीषदेत चर्चा करण्यास विरोध केल्याने जागतिक लोकमत चीनच्या विरोधात बनले.

६) अमर्याद सत्ता एकहाती असणारा देश जागतिकीकरण व मुक्त अर्थव्यवस्थेचा गैरफायदा घेऊन संपूर्ण जगाला कशा प्रकारे वेठीस धरु शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे चीन हे स्पष्ट झाले.

७) जगातील बहुसंख्य देश चीनच्या विरोधात जाऊन जगाच्या राजकारणात चीनला एकाकी पाडतील असे दिसून येते. (अमेरिका, जपान, द. कोरिया, ब्राझील, इटली, ऑस्ट्रेलिया, स्पेन, पोर्तुगाल, कॅनडा इ.)

८) जागतिकीकरणास खीळ बसेल कारण २०२० च्या सुरुवातीपासून कोरोनाचा प्रसार चालू झाला. प्रत्येक देश स्वत:चा बचाव कसा करावा याचा विचार करु लागला. वैश्विक महामारी असताना गरीब देशांची यामध्ये काय स्थिती असेल याबाबत कुठेच विचार दिसला नाही. अमेरिका, इटली, स्पेन, चीन या देशामध्ये रोम हतीरो जीव जाऊ लागले. परिणामी सर्वांना आपला देश सोडून जगाचा विचार करण्यास वेळ मिळाला नाही. साधारणपणे यामुळे जागतिकीकरण मुक्त अर्थव्यवस्था व मुक्त संचार या गोष्टींना आवर घातला जाईल. यालाच De-Globalization असे म्हणता येईल.

९) देशाची अर्थव्यवस्था व संरक्षण व्यवस्था बळकट असेल तर तो देश प्रगती करु शकतो ही संकल्पना मोडीत निघून देशातील नागरीकांचे आरोग्य तितकेच महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट झाले. केवळ संपत्तीतून आरोग्य बलशाली करता येत नाही हे सिध्द झाले. कारण कोरोनाला बळी पडलेले बहुतेक देश विकसित आहेत.

१०) चीनी वस्तू आरोग्य साहित्य हे केवळ पैसे मिळवण्यासाठी बनविले हे सिध्द झाले. कारण पी.पी.ई कीट रक्त चाचणी करावयाचे कीट मास्क या सर्व वस्तु चीनने पुरविल्या मात्र त्या बोगस असल्याच्या तक्रारारी जगभरातून झाल्याने चीनी वस्तूंची उपयोगिता यावर पुन्हा एकदा प्रश्न चिन्ह निर्माण झाले.

११) चीनमधून कोरोनाचा प्रसार झाल्यानंतर कोरोनावर औषध नाही व्यक्तीने सामाजिक अंतर ठेवन वापर करावा लागेल. लॉक डाऊन चा वापर करावा लागेल या सर्व चिनमधील उपायांचा वापर जगभर सुरु झाला. लॉक डाऊनमुळे मानवी जीवनावर बंधने आली. स्वातंत्र्यावर बंधने, संपूर्ण निर्णयाचे स्वातंत्र्य सरकारच्या हाती गेल्याने व्यक्तीच्या वैयक्तिक

जीवनाबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य सरकारच्या हाती गेले परिणामी संचार धार्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले.

१२) लॉकडाऊनमुळे जगातील उत्पादक व विक्री व्यवस्थेवर याचा परीणाम होऊन बाजारपेठच कोलमडली परीणामी सरकारला मिळणारे कराचे उत्पन्न देखील कमी झाले. संपूर्ण विकासाच्या योजना ठप्प होऊन सरकारचे सर्व लक्ष आरोग्य व्यवस्थेकडे दिले गेले. परिणामी जागतिक अर्थवस्था कोलमडून शेअर बाजार घसरले. अमेरिका सारख्या देशात बेकारीचे प्रमाण ४० टक्के पर्यंत गेले. भारतात ते २३ टक्के पर्यंत गेले.

१३) संपूर्ण जगातील व्यवस्था कोरोनामुळे सजग होऊन शिक्षण व आरोग्य हे देखील देशाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाच्या गोष्टी असल्याचे दिसून आले. त्यामुळे येथून पुढे सर्व देश आरोग्य व शिक्षणाकडे काळजीपुर्वक लक्ष देतील.

१४) जगभरामध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपली केलेला प्रसार याच्यामधून तह झाला. कारण येथून पुढे बहुराष्ट्रीय कंपन्या नफ्याच्या पाठीमागे धावतात. त्यांना मानवी जीवनाची किंमत अजिबात नाही हेच आता कोरोनाच्या प्रसंगाने दिसून आले. काही देशांमध्ये या बहुराष्ट्रीय कपंन्यांनी लॉकडाऊन करण्यास विरोध केला. त्यासाठी त्यांनी सरकारवर दबाव आणला. यामुळे याचे महत्व मानवी जीवनातून राष्ट्राच्या प्रगतीच्या दृष्टीकोणातून कमी होईल.

१५) कोरोनाच्या प्रसारामुळे प्रत्येक देशाच्या नेतृत्वाकडे ज्यादा अधिकार आले. त्यांनी कोरोनाचा लढा राष्ट्रवादासाठी उपयुक्त आहे. त्यासाठी देशाभिमान असलेल्या प्रत्येक व्यक्तीने देशासाठी सर्वकाही त्याग केले पाहिजे असा प्रसार केला. परिणामी काही देशांमधून राष्ट्रवादाची लाट निर्माण झाली. कोरोना योधांना पाठिंबा देण्यासाठी विशिष्ट वेळी टाळया वाजविणे, दिवे लावणे किंवा सैन्यदलाकडून मदत घेणे, यासर्वांच्यासाठी आदर व्यक्त करणे अशा बाबींचा वापर केला. यामध्ये जागतिक नेत्यामध्ये काही नेत्यांची प्रतिमा उजळली. उदा. अमेरिका—ट्रम्प, इंग्लड—बोरीस जॉन्सन, जर्मनी—अंजेला मार्कर, रशिया—पुतिन, भारत —नरेंद्र मोदी इ.

**संदर्भसुची:**


१. https://www.who.int/emergencies/diseases/novel-coronavirus-2019 pm
२. https://covid19.who.int/region/searo/country/in ,
३. https://www.who.int/news-room/q-a-detail/q-a-coronaviruses
४. https://t.me/t.me /skdeolankar१
५. https://t.me/skdeolankar
६. HTTPS://maharashtra/7.com